

# २०१६सालचा ऑस्कर पारितोषिक वितरण सोहोळा: पांढरा की रंगीबेरंगी?

**- शशिकांत पानट (लॉस एंजलीस, कॅलिफोर्निया)**



अकॅडमी ऑफ मोशन पिक्चर्स, आर्ट्स ॲन्ड सायन्स (AMPAS) या संस्थेने १९२७ आणि १९२८ या वर्षी तयार झालेले चित्रपट हिशोबात घेऊन १६ मे १९२९ या दिवशी पहिला पारितोषिक सोहोळा सुप्रसिद्ध हॉलीवूड रूझवेल्ट या हॉटेलमधे साजरा केला. ह्या सुरुवातीच्या खाजगी समारंभाला फक्त २७० पाहुणे उपस्थित होते. तेव्हांपासुन ते आजतागायत ऑस्कर पारितोषिक मिळविणे हे चित्रपट कलावंतांना नोबेल पारितोषिक मिळविण्याइतकेच महत्वाचे, समाधान मिळवून देणारे व विशेष मानसन्मान मिळवून देणारे ठरले आहे.

जसजशी वर्षे उलटली, तशी ऑस्कर पारितोषिके मिळविण्याची जिद्द वाढीलाच लागली. हे पारितोषिक म्हणजे चित्रपट कलेच्या क्षेत्रामधला सर्वोच्च सन्मान समजला गेला. गेल्या जवळ जवळ ८० + वर्षांत पारितोषिकाचा कसही बदलत गेला. तो जास्त कडक आणि शिस्तीचा झाला. हळूहळू त्यामधे परदेशी चित्रपटांचा अंत:र्भावही करण्यात आला. ऑस्करच्या तोडीचा अनुभव असलेल्या कलावंतांची बिदागी इतरांच्या मानाने जास्त मिळू लागली. हा समारंभ म्हणजे ऑलिंपिक विजेत्या खेळाडूंसारखाच मोठ्या थाटामाटाने होऊ लागला. चित्रपट क्षेत्रामधला मानाचा तुरा असा सिद्ध झाला.

तसे आतांपर्यंत सुरळीतच चालले होते. मात्र या वर्षी त्याला थोडे गालबोट लागते आहे! या वर्षी त्याला रंग फासला गेला आहे. हा समारंभ विशेषकरून केवळ पांढऱ्या कलाकारांनाच न्याय देतो, आणि शिवाय तेही पुरूष कलाकारच. स्त्री कलाकारांना, विशेषकरून काळ्या स्त्री कलाकारांना ही पारितोषिके हव्या त्या प्रमाणांत मिळत नाहीत

असा आरोप अकॅडमीवर (अकादमीवर ) केला गेला आहे. त्यामधील सत्यासत्यतेची जाण व्हायच्या आंतच कांही काळ्या सुपरस्टार्सनी यावर्षी समारंभावर बहिष्कार घालण्याचा निर्णयही घेऊन टाकला आहे. ही नांवे हॉलीवूडमधली गाजलेली, पुर्वी ऑस्कर पारितोषिके मिळविलेली असल्याने तर त्यांचे बोलणे मनावर घेऊन अकादमीने त्यात सुधारणा करण्यासाठी पाऊल उचलेले आहे. हॉलीवूडनगरी आणि त्यामधे चालत असलेला हा व्यापार कार्यवाहीसाठी तत्पर आहे हेही त्यामुळे साऱ्या जगाला कळले.

२८ फेब्रुवारी, २०१६ रोजी, हॉलीवूडमधे होणाऱ्या या समारंभाची माहिती, आकडेवारी या लेखाच्या निमित्ताने रसिकांपर्यंत पोहोचवावी हा या लेखनाचा उद्देश आहे. अकादमीवर होणारे आरोप खरे की खोटे, ह्या चर्चेपासून अलिप्त राहून केवळ समारंभाच्या पार्श्वभूमीबद्दल चर्चा करणे हा आणि केवळ हाच हेतू आहे! त्यामुळे माझे व्यक्तिगत मतप्रदर्शन मी केवळ खाजगी बैठकीपुरतेच मर्यादित ठेवणार आहे. उद्देश असा, की जाणकारांनी त्यांचे स्वत:चे मत तयार करावे. असो

अकादमी आता ८९ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे. गेल्या ८९ वर्षांत खाजगी समारंभापासून सुरू केलेली ही गंगोत्री आता एका विशाल सागरासारखीच रुंदावली आहे. त्यामुळे भरपूर अनुभव गाठीला बांधून आणि कोणते चित्रपट पारितोषिकासाठी स्पर्धेत आलेले आहेत ते हिशेबांत घेऊनच आतापर्यंतचे नियम केलेले आहेत, आणि कालानुसार त्यामधे योग्य ते बदलही केले गेले आहेत. मग याच वर्षी असा मुद्दा का आणला जातो आहे, हाही एक संशोधनाचा विषय होऊ शकेल. असो

वास्तविक पहाता ४ वर्षांपूर्वीच म्हणजे २०१२ पासून अकादमीने जास्तीत जास्त स्त्री-कलाकार आणि अल्पसंख्यांक गट यांना उत्तेजन देण्यासाठी कांही आमूलाग्र बदल करायला सुरुवातदेखील केलेली आहे. सध्या ज्या कलाकारांना आयुष्यभर मतदानाचा अधिकार दिला आहे ती संख्या ६२६१ आहे. मात्र सगळे लोक मतदानाचा अधिकार बजावतातच असे नाही! सध्या जो आरोप अकादमीवर केला जातो आहे त्यावर उपाय म्हणुन त्यांनी तातडीची बैठक घेऊन खालील निर्णय घेतले आहेत.

१. मतदान अधिकार मिळालेल्या ज्या कलाकारांनी गेल्या कांही वर्षांत मतदानाचा हक्कच बजावला नाही, त्यांचा अधिकार अकादमी ताबडतोब काढून घेईल.

२. त्यांच्या जागी दुसऱ्याला मतदानाचा अधिकार देतांना शक्यतोवर अ-पांढरे आणि अल्पसंख्यांक/मायनॉरिटी -कृष्णवर्णीय आफ्रिकन, एशियन, हिस्पनिक वगैरे वंशाचे स्त्री कलाकार- ह्यांना संधी दिली जाईल.

३. आणि हे करतांना आजपासुन ते २०२० पर्यंत म्हणजे पुढच्या केवळ ४ वर्षांत सध्या असलेल्या एकंदरित अ-पांढरे- स्त्री कलाकारांची, काळ्या स्त्री कलाकारांची संख्या दुपटीवर नेण्यात येईल.

अकादमीने उचललेले हे पाऊल फारच आक्रमक आहे. कलाकारांच्या तक्रारीला न्याय देण्यासाठी कंबर कसून कामाला लागल्याचे चिन्ह आहे.

सध्या अकादमीमधे १५०० स्त्री कलाकार आहेत. आणि ५३५ अ-पांढरे (अल्पसंख्यांक/ मायनॉरिटी कलाकार) आहेत. आता ही संख्या पुढील चार वर्षांत दुप्प्ट करायची असेल तर २०२० या वर्षी स्त्री कलाकारांची संख्या ३००० आणि अ-पांढरे कलाकार-संख्या १०७० होईल. याचाच अर्थ असा की पुढील चार वर्षांत प्रत्येक वर्षी ही संख्या अनुक्रमे ३७५ आणि १३४ ने वाढवावी लागेल. अकादमीच्या कसाला उतरण्यास योग्य असे इतके कलाकार उपलब्ध आहेत का? आणि समजा-फक्त समजा, की त्यांच्या कसाला उतरणारी ही एव्हढी कलाकार मंडळी मिळाली नाही तर? तर केवळ हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कसाचा दर्जा कमी करणार की काय? याचाच अर्थ असा, की २०२० साली जी संख्या तयार होईल, त्यामधे सर्व योग्य कलाकार असतील का? या निर्णयाचे दूरवरचे परिणाम किती धोकादायक असतील हे नव्याने सांगायला नकोच! अकादमीचे सध्याचे नियम हे खूप कडक आहेत. त्यामधे बसणारे कलाकार मिळाले नाहीत तर ऑस्करच्या मूळ संकल्पनेची किती वाट लागेल हे सांगायला भविष्य सांगणाऱ्याची गरज नाही! ह्याच अकादमीचे माजी अध्यक्ष हॉक कॉच (Hawk Koch) ह्यांनी अनुभवाचे बोल एका क्षणाचाही विलंब न लावता सांगितलेही आहेत. ते म्हणाले की, "सध्याच्याच कठिण नियमांत कलाकार बसत नाहीत. कारण पुरेसे चांगले कलाकारच नाहीत! मग अकादमीचे मंडळ आणणार आहेत कुठून १५०० नवीन स्त्री कलाकार आणि ५३५ अ-पांढरे कलाकार? आणि तेही पुढच्या चार वर्षांत? आणि मग ही संख्या केवळ जाहीर केली आहे, म्हणून पूर्ण करण्यासाठी नियम शिथिल करणे हेच करावे लागेल ह्यांना! मग गुणवत्तेच्या  दर्जाचे काय? थोडक्यांत म्हणजे केवळ संख्या पूर्ण करण्यासाठी ती गुणावत्तेच्या दर्जाशी केलेली तडजोड असेल.

परंतु विचार करण्यासारखी गोष्ट अशी आहे, की ह्या सर्व गोष्टींसाठी अकादमी खरोखरीच जबाबदार आहे कां? अकादमीकडे जे चित्रपट निवडीसाठी म्हणून आणले जातात, त्यामधूनच ते पारितोषिकासाठी कलाकार निवडणार ना!  संपूर्ण अमेरिकेतून शेकडो चित्रपट ऑस्करसाठी पाठविले जातात. त्यामधून निवडसमिती काही मोजकेच चित्रपट अकादमीकडे पाठविते. आणि केवळ त्यामधूनच अकादमीला ऑस्करसाठी चित्रपट आणि त्यामधले कलाकार निवडायची संधी असते. निवडसमिती कोणते चित्रपट वेचून पाठविते त्यावर अकादमीला कांहीच अधिकार नाहीत. त्यांनी फक्त समोर आलेल्या कलाकृतींमधूनच निवड करायची असते. निवडसमितीकडे रंगीबेरंगी कलाकारांचे अथवा अल्पसंख्यांक (मायनॉरिटींनी) कलाकारांनी कामे केलेले चित्रपट पुरेसे येतात का? समजा ते पुरेसे येतच नसले तर? म्हणजे खर तर गाऱ्हाणे वा तक्रार करायचीच असेल तर ती जी निवडसमिती सुरुवातीस त्यांना अभिप्रेत असलेला कस (Criteria) लावून चित्रपटांची निवड करतात त्यांच्याकडे करायला हवी नाही का? आणि तक्रार करणाऱ्या मंडळींना हे माहीत नाही असेही नाही! मग ते अकादमीस कां छळताहेत? हे सारे माहीत असतांना ते थेट निवडसमितीकडे का जात नाहीत? निवडसमितीकडे तक्रार करणे हे त्यांना सहज शक्य आहे, पण ते करीत नाहीत! त्याला अर्थात अनेक कारणे आहेत. एकतर ते त्यांना परवडणारे नसावे, कारण शेवटी निवडसमितीच ठरविणार की पुढे कोणते चित्रपट निवडायचे! म्हणजे त्यांना दुखवून चालणार नाही. शिवाय तक्रार केली, तरी निवडसमिती इतकी बहाद्दर आहे, की ती त्याकडे फारसे लक्ष देणार नाही. कदाचित पुरेसे चित्रपट स्पर्धेमधे भाग घ्यायला उतरतदेखील नसतील, आणि हे सत्य पचविणे सगळ्यांनाच कठिण जाईल. असे असले, तर तक्रार करणाऱ्या मंडळींच्या गाऱ्हाण्यातली हवाच निघून जाईल. म्हणजे ही शक्यता नाकारता येणार नाही. निवडसमितीची भूमिका अशीही असण्याची शक्यता आहे, की समजा १०० चित्रपट पारितोषिकासाठी सादर केले, आणि त्यातले ८० पांढऱ्या लोकांनी तयार केले आणि उरलेले अ-पांढ-यांनी वा

इतरांनी केलेले असले, तर त्या प्रमाणातच शेवटी निकाल येईल, तेथे भेदभावाचा प्रश्नच कुठे येतोय? शिवाय थेट निवडसमितीकडे जाऊन मांजराच्या गळ्यांत घंटा कोण बांधणार? निवडसमिती ही अशाच मंडळींची तयार केली आहे की ते हा सर्व प्रकार व्यापार म्हणून पाहात आहेत आणि कोणत्याही भावनिक दबावाची ते फारशी दखल घेणार नाहीत.

शेवटी चित्रपट-निर्मिती ही केवळ कलेसाठी कला म्हणून नव्हे तर तुमच्या गुंतवणुकीवर तुम्हाला किती नफा मिळतो आहे, आणि तो वापरून तुम्ही सरकारला किती कर देऊ शकणार आहात, मिळालेल्या नफ्यातून अजून किती अधिक चित्रपट- निर्मिती करणार आहात, आणि हा धंदा भरभराटीला आणणार आहात? हेही महत्वाचे आहेच ना!

या वर्षी ऑस्कर पुरस्काराचे व्यवस्थापन अधिकारी एका डझनाच्यावर काळे कलाकार प्रेझेंटर्स आणणार आहेत. शिवाय अ-पांढरे प्रेझेंटर्समधे आपल्या भारताची प्रियांका चोप्रा देखील आहे. एक काळा कलाकारच ख्रिस रॉक (Chris Rock) या समारंभाचे यजमानपद गेली अनेक वर्षे करतो आहे.

ऑस्करसारख्या एका कलेच्या देवळांत आमचा देव काळा आणि तुमचा देव पांढरा असा वाद न घालतां त्या देवांची पूजा बांधण्याची संधी मिळणे हे जास्त महत्वाचे असावे. म्हणूनच रंगांच्या पलीकडे विरोधकांची दृष्टी असणे ही निदान या वर्षीच्या समारंभाची गरज आहे.

शेवटी फक्त एकच, की धंदा आणि कला यांची सांगड घालणे भल्याभल्यांना जमले नाही. आज हॉलीवूडदेखील त्याच उंबरठ्यांत अडकले आहे हे मात्र खरे!

***